संदर्भ – कार्यालयीन आदेश क्र.२६१, दिनांक १६/०७/२०२१

.......

जिल्हा न्यायालय,ठाणे
दिनांक : १६/०७/२०२१

## कार्यालयीन आदेश क्रमांक २६२
(शिपाई पदावर नेमणूकपत्र)

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, ठाणे 'शिपाई' या पदावर नेमणूकी संदर्भात खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत. सदर आदेश दिनांक २२/०७/२०२१ मध्यान्हपुर्व पासुन अंमलात येतील.

०१/ दिनांक २१/११/२०१८ रोजी प्रसिध्द झालेल्या 'शिपाई' संवर्गाच्या निवडयादीमधील खालील उमेदवाराची 'शिपाई' या पदावर ७व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर S-1: रू.१५०००–४७६००/– यामध्ये संपूर्णत: अस्थायी व तात्पुरत्या स्वरूपाची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव, पत्ता व निवडयादीमधील अनुक्रमांक | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्री गणेश लक्ष्मणराव चांदणे<br>(उमेदवार क्र.८२)<br>रा.७३७, कांतीनगर, कारेगांवरोड, परभणी, ता.परभणी, जि.परभणी, पिन कोड ४३१४०१. | सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वसई यांच्या आस्थापनेवर, निवडयादीतील उमेदवार क्र.८० श्री बालासाहेब आश्रोबा गवळी यांचे नांव निवडयादीतून कमी केल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर पदस्थापित. |

०२/ सदर नेमणूक पूर्णत: अस्थायी स्वरूपाची असून सदर उमेदवारास केंव्हाही कोणत्याही प्रकारे नोटीस न देता सेवेतून कमी करण्यात येईल.

०३/ सदर उमेदवाराने आपल्या उपरोक्त नेमणूकीवर नमूद तारखेस न चुकता हजर रहावे. तसेच नेमणूकीच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत हजर न झाल्यास सदर उमेदवाराचे नांव निवड यादीतून कमी करण्यात येईल.

०४/ सदर उमेदवारास समज देण्यात येत आहे की, जर त्याने सदर नेमणूक एक महिन्याची नोटीस न देता सोडल्यास त्याचेकडून त्याच्या एक महिन्याचे मूळ वेतन इतकी रक्कम वसूल करण्यात येईल.

०५/ उमेदवाराने नेमणुकीच्या ठिकाणी हजर होतांना,

१. त्याचा स्वत:चा मूळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह हजर व्हावे.

२. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा—४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि.३१/१०/२००५ अन्वये असे सूचित करण्यात येते की, १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन 'परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना' लागू ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम—१९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

ठाणे
दिनांक १६/०७/२०२१

( रविंद्र म. जोशी )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
ठाणे

....................

जा.क्र.आस्था/४०३४/२०२१
जिल्हा न्यायालय, ठाणे
दिनांक १६/०७/२०२१

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना</u>

०१. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वसई

०२. प्रबंधक, जिल्हा न्यायालय, ठाणे

०३. अधीक्षक, प्रशासन विभाग, जिल्हा न्यायालय, ठाणे.

०४. सहा. अधीक्षक, रोखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, ठाणे

०६. व.लिपीक, पी.डी.एस.,/गोपनिय अहवाल, जिल्हा न्यायालय, ठाणे

०७. श्री गणेश लक्ष्मणराव चांदणे, उमेदवार क्र.८२.

हुकूमावरून,

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, ठाणे